# महिला सक्षिमीकरण आणि मानवी हक्क

**प्रा. प्रमिला नानाजी मोहिते**

संशोधक विद्यार्थीनी

रा.तु.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर

---

**प्रस्तावना –**

प्राचीन भारतात स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान होते. गार्गी, मैत्रेय व अत्रेची यांनी तर विदुषी म्हणून विव्दतसभेमध्ये मानवी जागा मिळत असते. प्राचीन भारतात स्त्रीचा मान राखला जात असते. पण मध्ययुगीन काळात परकीय आक्रमणे वाढली आणि सुरक्षित असलेली स्त्री असुरक्षीत झाली. ब्रिटीश आणि स्वातंन्योत्तर काळात स्त्री सुधारणेसाठी वेळोवेळी कायदे करण्यात आले. गेल्या पाच दशकात त्यामध्ये बदल झालेला आपणास दिसतो आहे. महिला विविध क्षेत्रात आघाडीवर दिसू लागल्या असल्यातरी त्यांचे प्रमाण हे काही क्षेत्रात नगण्य, अल्प असे दिसून येते.

**उद्‌देश –**

१. महिलांच्या सबलीकरणात कुटुंबाची भूमिका जाणून घेणे.

२. शिक्षणामुळे होणारे बदल जाणून घेणे.

३. महिलांच्या शिक्षणाचा दर्जा व कुटुंबाचा प्रकार आणि महिला सक्षमीकरण यातील संबंधाचे अध्ययन करणे.

४. महिलांना संघटित करून त्यांना आर्थिकदृष्टया सशक्त व सबल करणे.

५. वेळेप्रसंगी सहज उपलब्ध होणारी आपल्याच पैसातुन मिळणारी मदत त्यातुन महिलांना दिलासा मिळते.

६. भारतीय समाजातील महिलांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे.

**गृहीतक –**

१. महिलांच्या सबलीकरणात कुटुंबाची भूमिका महत्वाची आहे.

२. महिलाचे शिक्षण व महिलांच्या सक्षमीकरण यांचा संबंध असतो.

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत संशोधनांतर्गत याच संदर्भात वर्णनात्मक व विश्लेषण पध्दतीने अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्याचबरोबर दुय्यम स्त्रोत ग्रंथ, पुस्तके, शोध निबंध नियतकालिके यांचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती –**

१) महिला सक्षमीकरणासाठी महिलांचे आर्थिक स्वावलंबन आणने.

२) महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाचा अभ्यास, शिक्षण, सामाजिक क्षेत्रात महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुरूषांच्या भुमिकेचा अभ्यास.

३) सक्षमीकरणाबरोबर भारताच्या सांस्कृतिक, वारसात बदल घडवून आणणे व समाजात त्यांचा

Research Hub International Journal

दर्जा सन्मानीय बनवणे आवश्यक आहे.

४) सर्व लाकांच्या मानव अधकारांप्रति आदरास प्रोत्साहन देण्याची भूमिका जाणून घेणे.

५) ज्ञान, कौशल्य आणि मानव अधिकारांची मुल्ये जाणून घेणे.

६) समाजिक मानसिक व मानवी व्यक्तिमत्व विकसित करणे

७) सलोखा, साहिष्णुता व स्त्री—पुरूष समानता वाढविण्यास मदत करणे.

मानव अधिकार शिक्षणाच्या मुल्यांना रूजविण्यासाठी अनेक प्रतिमान विकसित करण्यात आणि आहेत विविध प्रतिमानपैकी खालील तीन प्रतिमान मानव अधिकारांची उद्दिष्टे व ध्येय साध्य करण्यासाठी महत्त्वपुर्ण मानली जातात.

१) मूल्ये आणि जागरूकतेचे प्रतिमान हे प्रतिमान मानव अधिकारांचे मुलभूत ज्ञान हस्तांतरित करण्यावर आरणि शैक्ष्णिक संस्थाच्या पाठयक्रमाच्या माध्यमातून सार्वजकिनक मुल्यांमध्ये एकीकरणास प्रोत्साहीत करण्यावर लक्ष केंद्रित करते.

२) उत्तरदायित्वाचे/जबाबदारीचे प्रतिमान: हे प्रतिमान मानव अधिकार उल्लंघनाचे निरीक्षण करण्यासाठी अधिकाऱ्ययांना निर्देशित करण्यासाठी ज्या मार्गाचे अवलंबन करावयाचे आहे. त्या व्यावसायिक जबाबदाऱ्यावर लक्ष केंद्रित करते.

३) रूपांतरित प्रतिमान: या प्रतिमानाचा उद्देश मानव अधिकारांचे दुरूप्योग ओळखण्यासाठी आणि ते प्रतिबंधित करण्याच्या दिशेने लोकांना सशक्त करण्याचा आहे.

आधुनिक काळात महिला सक्षमीकरणाकडे सकारात्मक दृष्टीकानातून पाहिले जात आहे. महिला सक्षमीकरण ही स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध करून देणारी स्त्री अधिकाराचा पुस्कार करणारी आणि स्त्री पुरूष समानतेवर आधरीत आहे. या प्रक्रियेमध्ये स्त्रियांना शारीरिक, मानसिक व बौध्दीक विकास साधुन स्त्रियांना जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीख व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये पुरूषांच्या बरोबरीने समान हक्क आणि अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात आजतागायत विविध घटकांचा माध्यमातून प्रयत्न केले गेलेले आहेत. अगदी शिवाजी महाराजांच्या काळापासून महिलांना सन्मानाची वागणुक मिळावी आणि महिलांचा उत्कर्ष व्हावा ही भूमिका निर्माण केल्या गेली. अनेक सामाजसुधारक, विचारवंतानी महिला स्वातंत्र्य आणि त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. अनेक वर्षापासून 'चुल आणि मुल' या कार्यक्षेत्रात अडकलेल्या व माणूस म्हणूनही जगता न येणारी आगतिकता वर्षानुवर्षे भोगणाऱ्या महिलासाठी ही एक स्वातंत्र्याची पहाटच म्हणावी लागेल. महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेमुळे महिलांचे विविध क्षेत्रात कर्तृत्व उदयास येत आहे.

**स्त्री/महिला सक्षमीकरण म्हणजे काय?**

समानता व सर्वांगिण विकासाठी महिला सक्षमीकरण गरजेचे आहे. महिला सक्षमीकरणाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी काही व्याख्या लक्षता घेऊन अर्थ स्पष्ट करणे सुलभ होईल.

ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये महिलांचे सक्षमीकरण म्हणजे त्यांना नैसर्गिक कायदेविषयक नैतिक अधिकार देणे होय. महिला सक्षमीकरण ही दीर्घ स्वरूपाची प्रक्रिया असल्याचे सांगितले आहे.

निर्मला सामंत—प्रभावळकर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या भूतपूर्व अध्यक्षा यांनी महिलांचे

सक्षमीकरण म्हणजे 'चुल आणि मुल' या पारंपारिक भूमिकेतून व चक्रातुन बाहेर काढून स्त्रीला ती एक व्यक्त‌ माणूस आहे. म्हणून विकसित होण्यासाठी समान संधी व प्रतिष्ठा देणे होय. यासाठी स्त्रीयांना आरोग्य, शिक्षण, समाजकारण, अर्थकारण, राजकारण च्या बाबतीत सक्षमक करणे होय. महिलार सक्षमीकरण म्हणजे त्यांच्या विकासाठी स्वातंत्र्याची समान संधी असणे होय.

**महिलांचे मानवी हक्क (मानवी अधिकार) —**

भारतातील मानवी हक्क १९४८ मध्ये जाहीर केलेल्या मानवी हक्कांचे धोरण जागतिक पातळीवर बहुतांश राष्ट्रानी स्वीकारले असून भारत हे राष्ट्र त्यापैकीच एक होय. भारतातचे संविधान म्हणजेच मानवी हक्क प्रत्यक्षात आणण्यासाठ‌ भरतीय समाज कटिबध्द असल्याचे घोषणापत्र आहे असे म्हणता येईल. भारताच्यासंविधानातच महिलजा व पुरूषांच्या सर्व मानवाधिकारांचा समावेश करण्यात आला आहे.

**महिलांचे मानवी हक्क —**

महिलांना जन्माने प्राप्त झलेले आणि सन्मानानेजीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले अधिकार होय. मानव अधिकाराचा संबंध महिलाच्या प्रतिष्ठैशी आहे. महिला असलेली आतसन्मानाची भावना, महिलेच्या प्रतिष्ठेला रेखांकित करत असते आणि हीच भ्‍ज्ञावना मानवी समाजाला पुढे नेण्याचे काम करत असते. थोडक्यात असे म्हणता येईल की, मानव अधिकार मानवी स्वभावात अंतर्भूत आहेत आणि हे अधिकार मानवाच्या समग्र विकासाठी आणि आत्मसन्मानासाठी अनिवार्य आहेत.

**महिलांसाठी काही मानव अधिकार खालीलप्रमाणे —**

१. महिलांसाठी प्रत्येक क्षेत्रात पुरूषाबरोबर समान अधिकार (हक्क) देण्यात येतील. जर कोणी यासाठी विरोध, अत्याचार, अन्याय व मर्यादा आणल्या तर तो एक अपराध मानला जाईल.

२. महिलांच्या विरोधात असणाऱ्या परंपरा रिती—रिवाज, प्रथा, कायदे, नियम व व्यवहार यांना समाप्त करण्यासाठ‌ल्योग्य ती पावले उचलण्यात येतील तसेच महिला व पुरूषांच्या समानतेच्या हक्कांसाठी र्प्याप्त कायदयाचे संरक्षण देण्यात येईल.

३. महिलांनापुरूषांप्रमाणे राष्ट्रीयता प्राप्त करण्याचा बदलण्याचा किंवा ती तसेच ठेवण्याचा अधिकार असेल एखादया विदेशी पुरूषाबरोबर विवाह केल्यास महिलेच्या (पत्नीच्या) राष्ट्रीयतेवर आपोआप कोणाच परिणाम होणार नाही. अशी महिला राज्यविहीत होणार नाही किंवा तिला पतीचे राष्ट्रीयत्व दाखण्याची गरज नाही.

४. महिलांना हीन मानणाऱ्या विचारांवर आधारित सर्व तऱ्हेच्या प्रथा आणि परंपराना मिटवून पुर्वग्रहांना समाप्त करण्याच्या दिशेने जनमताला शिक्षित करण्यात येईल त्याबरोबर राष्ट्रीय भावनांना या दिशेने वळवण्यासाठी सर्व योग्य ते उपाय करण्यात येतील.

५. पती आणि पत्नीच्या समान सिध्दांताला सुनिश्चित करण्यासाठी सर्व तऱ्हेचे योग्य ती पावले उचलली जातील आणि खास करून महिलांना आपला जीवनसाथी निवडणे, आपल्या स्वत:च्या सहमतीनेच विवाह करण्याचे पुरूषासारखेच स्वातंत्र्य असेल विवाहाच्या वेळी किंवा नंतर महिलांचे अधिकार पुरूषांसारखेच असतील तसेच महिलांची होत असलेली खरेदी विक्री तसेच त्यांना वेश्याव्यवसायापासून थांबवण्यासाठी कायदे बनविण्यासापासून एकूण जे जे योग्य

Research Hub International Journal

वाटतील ते–ते उपाय करण्यात येतील. मुलांच्या बाबतीत माता–पित्यांचे अधिकार आणि कर्तव्य समान असतील.

भारतीय संविधानात मानवी हक्कांचा यथोचित सन्मान नी आदर केलेली आहे. मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संविधानात पुरेशा तरतुदी करण्यात आल्या आहेत याशिवाय राष्ट्रीय मानवी हक्क आयोगही मानवी हक्कांचे संरक्षण जतन आणि संवर्धन करण्यासाठी कार्यरत आहे. समाजात कोणत्याही व्यक्तीसोबत भेदभावपूर्ण व्यवहार करणे. हा एकप्रकारचा समाजिक अन्याय आहे. सध्या जीवन जगण्यासाठी सामाजिक न्यायाची नितांत गरज आहे. भारतीय समाजात जात–धर्म–लिग यावर आधारित विषमता दिसून येते. ही विषमता म्हणजे व्यक्तीच्या व्यक्तेच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होय. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने आणि निर्भयपणे जगता येते. हे मानवी हक्कात अभिप्रेत आहे. हा हक्क व्यक्तीच्या विकासाठी आणि आनंदासाठीही आवश्यक आहे. सर्व समाजात व्यक्तीला सन्मानाने जीवन जगता येईल.अशी परिस्थिती निर्माण करणे. हे मानवी हक्कांच्या सर्वव्यापी व्यवस्थेला मुख्य उद्देश आहे.

**महिला सक्षमीकरणाचे विविध उपक्रम –**

२००१ हे वर्ष भारताचे महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषित केले. या वर्षात महिलांना सक्षम बनविण्यासाठी खालील बाबीवर भर देण्यात आले आहे.

१. महिलांच्या विकासासाठी कार्यक्रम योजना तयार करणे तसेच या योजनांचा गतिमान करणे.
२. महिलांप्रती होणारे दुर्व्यवहार हिंसाचार, अत्याार कमी करयावर भर देणे
३. महिलांना कौटुंबिक आर्थिक निर्णय घेण्यास सक्षम बनविणे
४. देशातील महिलांसाठध असे चित्र निर्माझा करायचे की त्यामुळे त्यांना सामाजिक आणि आर्थिक धोरण करून घेण्याबाबत जाणीव निर्माण करणे.
५. महिलांच्या शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सुरक्षा यावर सहभाग निश्चित करणे
६. पुरूषाप्रमाणे महिलांना सामाजिक राजकीय आर्थिकदृष्टया समाज अधिकार देणे.

**महिला सक्षमीकरण आणि मानवी हक्कांचा संबंध विश्लेषण –**

**लैंगिक समानता –**

महिला सक्षमीकरणाने लैगिक समानता प्राप्त करणे समाजाला व देशाचा शाश्वत विकास सुनिश्चित करण्यास मदत झाली अनेक जागतिक नेते आणि विव्दानांनी असा युक्तीवाद केला आहे की लैगिंक समानता आणि सक्षमीकरणाशिवाय शाश्वत विकास अशक्य आहे. शाश्वत विकास महिला सक्षमीकरणासह पर्यावरण संरक्षण सामाजिक आणी आर्थिक विकास स्विकारतो.

**रोजगार –**

महिलांना प्रत्येक क्षेत्रात पुरूषाबरोबर समान हक्क (अधिकार) देण्यात आले. रोजगारासारख्या क्षेत्रात महिलांच्या सक्षमीकरणावर शर्यतीचा अविभाज्य प्रभाव पडतो. रोजगारामुळे महिलांचे सक्षमीकरण होण्यास मदत होऊ शकते. सक्षमीकरणामुळे नोकरीतील समाधान आणि कामगीरीवर सकारात्मक परिणाम होतो. कामाच्या ठिकाणी समानता असल्याने सक्षमीकरणाची भावना मोठया प्रमाणात वाढू शकते.

**सुक्ष्म कर्ज –**

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या आणखी एक पध्दतीमध्ये सुक्ष्म कर्जाचाही समावेश होतो.

ज्या महिलांना उद्योजक बनवायचे आहे त्यांना सुक्ष्म कर्ज देणे.

**राजकीय सशक्तीकरण –**

सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात दोन्ही क्षेत्रात महिलांसाठी लैंगिक समानता आणि एजन्सीला सर्वोत्तम समर्थान देतील अशी धोरणे तयार करण्यास प्रोत्साहन देते. ज्या पध्दती सुचविल्या गेल्या आहेत त्या म्हणजे सकारातमक कृती धोरणे तयार करणे. महिलांना मतदानाचा अधिकार मत मांडण्याचा अधिकर निवडून येण्याचा अधिकार मिळाला आहे.

**डिजिटल कौशल्ये –**

डिजिटल कौशल्य असलेल्या आवाज उठवण्यास म्हणजे स्वत:वर आणि त्यांच्या समुदायावर परिणाम करणाऱ्या निर्णयांच्या परिणामांवर कार्य करण्यास अधिक चांगल्या प्रकारे सक्षम आहे. डिजिटल कौशल्ये महिलांना राजकीय चळवळभ्म्ध्ये सहभागी होण्यासाठी सक्षम बनवू शकतात.

**शिक्षणाची भूमिका –**

शिक्षणामुळे महिलांमध्ये त्यांच्या हक्कांबद्दल जागरूकता वाढू शकते. त्यांच्या स्वाभिमान वाढू शकतो आणि त्र्ूांना त्यांचे हक्क सांगण्याची संधी उपलब्ध होऊ शकते.

**इंटरनेट वापर –**

सोशल मिडीयावरील हॅशटॅशची निर्मिती प्रसार आणि प्रसार आणि वापर याव्दारे इंटरनेट हे अनेकदा महिलांच्या सक्षमीकरणाचे स्त्रोत आहे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वाढत्या इंटरनेट प्रवेशामुळे महिलांना स्वत:ला सक्षम करण्यासाठी विविध साधन उपलब्ध झाली. महिलांच्या ऑनलाईन सक्रीयतेसाठी फसवुक आणि ट्विटरसारखा सोशल नेटवर्किंग साइटसचा वापर करण्यास सुरूवात केली.

**निष्कर्ष –**

प्राचीन काळचे स्त्री व आजची आधुनिक काळातील महिला यांत बराच बदल दिसून येतो. सक्षमीकरणामुळे महिला ही अबल नसुन सबला झाली हे स्पष्ट होते. मानवी अधिकारामुळे स्वत:चा विकास व कौटुंबिक स्थिती सुदृढ राहावी याकरिता सतत महिला प्रयत्नात असते स्त्री निसर्गत सक्षम आहे परंतु सामाजिक बंधनामुळे ती उपेक्षित राहीली. आधुनिक काळातील महिला सक्षमतेविषयी मांडलेल्या विचारधारेने महिलामध्ये जागृती घडून आली. मानवी अधिकारामुळे आर्थिक पाया बदलल्यास स्त्री सक्षम झाली. संविधानात्मक तरतुदी आणि महिला विकास योजनांमुळे महिलांना विकासाची संधी मिळाली. स्त्री मुक्ती चळव्ळीच्या कार्यामुळै स्त्रियांच्या कार्यात आणि भूमिकेत संरचनात्मक परिवर्तन घडून आले. उच्च शिक्षित स्त्रियांचा समाजिक–आर्थिक विकासातील सहभाग राष्ट्र विकासाला साहाय्यक ठरतो.

**शिफारशी –**

१) उच्च शिक्षणाच्या संधी मुलींना मिळवून देण्यासाठी कुटुंबातील व्यक्तींनी पुढाकार घ्यावा.

२) आर्थिक स्वावलंबनासाठी नौकरी, व्यवसाय व सोबतच लघुउद्योग गत सहभाग महत्वाचा आहे.

३) महिला सबलीकरणासाठी विविध सामाजिक संस्थांनी पुढाकार घेवून महिलांसाठी सक्रिय कार्य करावे.

४) घटनेत स्त्री पुरूष समानता प्रत्यक्षात आणण्यासाठी स्त्री संघटनांनी पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

Research Hub International Journal

५) कुटुंबात मुलगा—मुलगी समान मानावे व समानतेची वागणुक कुटुंबातील व्यक्तींनी घ्यावी.

६) प्रसार माध्यमांची भूमिका सध्याच्या काळात फार महत्वाची आहे. स्त्री—पुरूष समानता रूजवणारे कार्यक्रम त्यांनी राबवावेत.

७) मानव अधिकाराच्या कायदयाची माहिती विशिष्ट शाखांपुरती मर्यादित न ठेवता सर्वश्रुत करावी.

**संदर्भ —**


- महिला सक्षमीकरण: डॉ. उपमा सकसेना, अध्यायान प्रकाशन, दिल्ली.
- महिला सक्षमीकरण: इंद्रराज सिंह, डायमंड पब्लिकेशन
- महिला सबलीकरण स्वरूप व समस्या: डॉ. शुभांगी गोटे—गव्हाणे वरद पब्लीकेशन औरंगाबाद २००४
- महिला सशक्तीकरण के नवीन आयाम: इंदु शर्मा, राधा पब्लीकेशन नई दिल्ली—२०११
- आर्थीक  व सामाजिक विकास:देसले किरण २०१७: देसले किरण, दिपस्तंभ प्रकाशन जळगाव.
- योजना विकास समर्पित मासीक (सप्टेंबर २०१६), माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
- कुरूक्षेत्र (ऑगस्ट २०१९), प्रकाशन विभाग सुचना आणिप्रससारण मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली.
- स्त्री सक्षमीकरणाची दिशा आणि वास्तविकता: प्रा. डॉ. ज्योती सुभाष सेलुकर, बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा, समाजशास्त्र विभाग
- २१ व्या शतकातील महिला सबलीकरण लेखक डॉ. विद्या मुकुंद ठवकर, गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख तह. पवनी जि. भंडारा
- ग्रामीण महिलाच्या सबलीकरणात कुटुंबाची भूमिका, श्री पंडीत पार्डीकर, प्रा. उषा माने , गृहविभाग प्रमुख बीड त. परळी


Research Hub International Journal